**पंतप्रधानांचे नामिबियाच्या संसदेला संबोधन (09 जुलै 2025)**

09 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी नामिबियाच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षा महामहिम सारा कुगोंगेलवा यांच्या निमंत्रणावरून आज नामिबियाच्या संसदेला संबोधित केले. नामिबियाच्या या विशेष सन्मानामुळे पंतप्रधानांची नामिबियाला औपचारिक भेट अधिक अर्थपूर्ण झाली.

2. नामिबियाच्या संसदेला संबोधित करताना पंतप्रधानांनी "लोकशाहीची जननी" असलेल्या आणि जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र असलेल्या भारताकडून या प्रतिष्ठित सभागृहाचे प्रतिनिधी आणि नामिबियाच्या अत्यंत मनमिळाऊ नागरिकांना शुभेच्छा दिल्या. उभय देशांमधील ऐतिहासिक संबंधांचे आणि उभय देशांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करून पंतप्रधानांनी नामिबियाचे संस्थापकीय जनक डॉ. सॅम नुजोमा यांच्या वारशाला आदरांजली वाहिली. उभय देशांच्या संस्थापकीय जनकांनी जपलेली लोकशाहीची मूल्ये आणि तत्त्वे आजही उभय देशांमध्ये प्रगतीचा मार्ग उजळत आहेत, असे ते म्हणाले. देशात लोकशाहीची मूल्ये रुजवण्यात नामिबियाच्या सरकारच्या आणि नागरिकांच्या भूमिकेचे त्यांनी कौतुक केले.

3. पंतप्रधानांनी नामिबियाचा सर्वोच्च नागरी सम्मान प्रदान केल्याबद्दल नामिबियाच्या नागरिकांचे आभार मानले. त्यांनी नमूद केले की ही विशेष कृती म्हणजे भारतीय आणि नामिबियातील लोकशाहीच्या कामगिरीला आदरांजली आहे. स्वातंत्र्य, समानता आणि न्यायाचे रक्षक म्हणून, त्यांनी दोन्ही देशांना ग्लोबल साऊथ देशांच्या भल्यासाठी काम करण्याचे आवाहन केले, जेणेकरून तेथील लोकांच्या भावना केवळ लक्षात घेतल्या जाणार नाहीत तर त्यांच्या आशा आणि आकांक्षा पूर्णपणे साकार होतील. आफ्रिकन युनियनला या गटाचा कायमस्वरूपी सदस्य बनवण्यात आल्यावर G-20 च्या अध्यक्षपदाच्या काळात भारताने जसे केले होते तसेच आफ्रिकेच्या प्रगतीसाठी भारत नेहमीच काम करेल असे त्यांनी अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, भारताला नामिबिया आणि आफ्रिका खंडातील इतर देशांसोबत विकासाचा अनुभव सामायिक करण्याचा बहुमान मिळाला आहे. भारत क्षमता निर्माण करण्यासाठी, कौशल्य विकसित करण्यासाठी, स्थानिक नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आफ्रिकेच्या अजेंडा 2063 ला पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे.

4. पंतप्रधानांनी त्यांना दिलेल्या सन्मानाबद्दल सभापतींचे आभार मानले. दोन्ही लोकशाही कायम समृद्ध राहाव्यात म्हणून त्यांनी दोन्ही देशांतील नागरिकांमधील परस्पर संवाद वाढवावा असे आवाहन केले. "आपल्या मुलांना केवळ आपण ज्या स्वातंत्र्यासाठी लढलो आहोत त्याचाच नव्हे तर आपण एकत्रितपणे घडवू शकणाऱ्या भविष्याचाही वारसा मिळू द्या." - असे त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप करताना म्हटले. पंतप्रधानांच्या भाषणाचा पूर्ण मजकूर येथे पाहिला जाऊ शकतो.

**विंडहोक**

**09 जुलै 2025**